http://www.epitomejournals.com Vol. 4, Issue 5, May 2018, ISSN: 2395-6968

Epitome : International Journal of Multidisciplinary Research
ISSN : 2395-6968

# ‘अस्वस्थ नायक’ बेकारीची तर ‘बुद्धाचा ऱ्हाट’ जात वास्तवाची व्यथा मांडणारी कादंबरी



**- मा. मा. जाधव**
मराठी विभाग, बहिर्जी स्मारक महाविद्यालय, वसमत,
जि. हिंगोली

## RESEARCH PAPER

उत्तम कांबळे यांची ‘अस्वस्थ नायक’ ही कादंबरी बेकारीचे वास्तव अधोरेखित करणारी आहे. याचबरोबर बेकारांच्या मनोव्यवस्थेचे चित्रण या कादंबरीतून आले आहे. ‘अस्वस्थ नायक’ ही कादंबरी पुष्प प्रकाशनने इ.स.2000मध्ये प्रकाशित केली. या कादंबरीची पाचवी आवृत्ती मनोविकास प्रकाशनाने डिसेंबर 2015 मध्ये प्रसिद्ध केली. समकालीन भारतीय समाजातील अतिशय कळीचा असणारा बेरोजगारीचा प्रश्न या कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे.

उत्तम कांबळे यांची आणखी एक कादंबरी ‘बुद्धाचा ऱ्हाट’ ही डिसेंबर 2015ला मनोविकास प्रकाशनाने प्रकाशित केली. या कादंबरीचा नायक रानबा असून, रानबाची कथा म्हणजेच ही कादंबरी होय. डॉ.

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EIJMR All rights reserved.

बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले धर्मांतर व नंतर त्यांच्या विचाराचा प्रभाव या कादंबरीच्या नायकाच्या व्यक्तिमत्त्वातून दिसून येतो. रानबाचा विचार आणि कृती कादंबरीतून प्रतिध्वनीसारखी उमटली आहे.

भारतीय समाजातील अस्पृश्यता, जात विषमतेचा विळखा त्यातून अस्पृश्यांच्या जगण्याची झालेली परवड व या सर्वांवर आंबेडकरी विचारांचा नायक कसा विद्रोह करतो, त्यातून निर्माण होणाऱ्या प्रश्नाची श्रृंखला कादंबरीच्या कथानकाच्या केंद्रस्थानी आहे. अस्पृश्यांच्या जगण्याचा प्रश्न व त्याची जागृत झालेली अस्मिता यांचा सामंती व्यवस्थेशी होणारा संघर्ष हे या कादंबरीचे मध्यवर्ती सूत्र होय. तसेच बेकारीचा प्रश्न केवळ बेकारांच्या जीवणापुरता मर्यादित न राहता तो कसे भयानक रूप घेतो, त्याचे वास्तदर्शी चित्रण म्हणजे ‘अस्वस्थ नायक’ ही कादंबरी होय. या दोन कादंबऱ्यांतील कथानक वास्तवाला कसे विविध अंगाने भिडते. त्याचा शोध या शोधनिबंधातून घ्यायचा आहे. रचनेपेक्षा तिच्या आशयाचाच विविध निकषांद्वारे शोध घ्यावयाचा आहे. एकूणच मराठी कादंबरीतील वास्तवदर्शीता संदर्भाने डॉ. रवींद्र ठाकूर यांनी जे भाष्य केले. ते भाष्य या कादंबरीच्या संदर्भात लक्षात घ्यावे लागते. “ साठ्ठोत्तरी मराठी कादंबरी अनेक दिशांनी, शाखोपशाखांनी विकसित-विस्तारीत झालेली दिसत असला तरी, वास्तवसन्मुखता हेच तिचे मुख्य वैशिष्ट्य राहिले आहे.”1

इतर वाङ्मयप्रकारापेक्षा कादंबरी हा वाङ्मय प्रकारच वास्तवदर्शनासाठी महत्त्वाचा असल्याचे मत हरिच्चंद्र थोरात यांनी व्यक्त केले आहे. उत्तम कांबळे यांच्या या दोन्ही कादंबरीच्या बाबतीत हे मतही महत्त्वाची वाटते. “ साहित्यातील वास्तवाची चर्चा करताना सर्वसाधारणपणे कादंबरी वाङ्मयप्रकार नजरेसमोर उभा राहतो. याचे कारण, कादंबरीतून वास्तवाचे साहित्यिकांनी चिन्हव्यवस्थेने केलेले रुपांतर हेच आहे.”2

1

‘अस्वस्थ नायक’ ही कादंबरी बेकारीसारख्या भयंकर प्रश्नाला भिडताना प्रशांत या व्यक्तिरेखेभोवती फिरत आहे. तो स्वतः बेकार आहे. तो कामाच्या शोधात असतो. त्याने डी.एड्.चे व्यवसायिक शिक्षण घेतले

 ©EIJMR All rights reserved.

आहे. तो ज्या खोलीवर भाड्याने राहतो. त्या घरमालकाच्या नातवाची शिकवणी घेण्याचा प्रयत्न करतो. परंतु, घरमालक बेकार काय शिकवणार असे म्हणून त्याचा प्रस्ताव नाकारतो. प्रशांतचे शिक्षण पूर्ण झाल्याबरोबर नवीन नौकऱ्या बंद होतात. शासनाच झिरो बजेटचे धोरण येते. अनेक ठिकाणी संगणकीकरण केल्यामुळे व दुसऱ्या बाजूला खाजगीकरण झपाट्याने होत असल्यामुळे नौकऱ्या हिरावून घेतल्या जातात, हा सर्व परिणाम जागतिकीकरणाचा आहे. जागतिकीकरणाचा विळखा समाजाला कसा पडला, त्याचे सुचनही ही कादंबरी करते. जागतिकीकरणाच्या दुष्परिणामावर महेंद्र भवरे म्हणतात, "जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे पेचदार अवस्था निर्माण झाली आहे. बहुराष्ट्रिय कंपन्यांच्या वर्चस्वामुळे दारिद्रेषेखालील दलित-पीडित- जातीजमातीचे अस्तित्व धोक्यात आले आहे. खाजगतीकरणामुळे विपरित परिणामाला सामोरे जावे लागते."3

या कादंबरीतील प्रशांत या पात्राची व्यथा बरोजगारीमुळे झाली आहे. प्रशांतचा मित्र सनदानंद कुसळे एकदा त्याला भेटतो. दोघेही डी.एड्.चे वर्गमित्र आहेत. प्रशांतची उपाशीपोटी अवहेलना पाहून ते दोघेही शिक्षण व्यवस्थेवर व आजच्या परिस्थितीवर चर्चा करतात. मित्र प्रशांतला सल्ला देतो, बंड न करता तडजोडीचे जीवन जगण्याचा. आपण स्वतः हुंडा घेऊन हुंड्याच्या पैशातील 50 हजार संस्थाचालकाला दिल्याचे सांगतो व दीड लाख रुपये बँकेत ठेवतो. व त्याच्या व्याजावर आपला उदरनिर्वाह चालवतो. प्रशांतला मात्र असा काही मार्ग सापडत नाही. बेकारीने उग्ररूप धारण केल्याने अनेक तरुण एकत्र येऊन सरकारच्या धोरणाविरुद्ध मोर्चा काढतात. गुणवत्तेवर नौकऱ्या देण्याच्या घोषणा करतात. यापैकी एक मित्र मोर्चेकऱ्यासमोर राखीव जागा, राजकारण यावर बोलतो. या मोर्चासमोर दुसरा एक तरुण भाषण करताना मागासवर्गीयांच आरक्षण बंद झाले पाहिजे, असे म्हणतो. हे सर्व भाषणे ऐकूण प्रशांतला जरा बरे वाटते. परंतु, त्याच्या जगण्याचा प्रश्न काही सुटत नाही. तेव्हा तो पुन्हा नौकरीच्या शोधात फिरत असतो. नाईलाज म्हणून तो एका दवाखान्यात पाचशे रुपयावर कंपाउंडरची नौकरी स्वीकारतो. पण, तिथेही ससेहोलपट चालू असते. येथे तो रुग्णांना खाण्यासाठी आग्रह करणारे लोक पाहिल्यावर त्याला आपण

 ©EIJMR All rights reserved.

रुग्ण व्हावे वाटते. येथेच त्याला पेन विकणारा बेकार तरुण भेटतो. अशोक एम.ए. होऊन बेकार असल्याने नाईलाजाने पेन विकण्याचे काम करतो. असे अनेक बेकार तरुण कादंबरीच्या वेगवेगळ्या प्रसंगातून आले आहेत. डॉक्टर योग्य तो पगार देत नसल्याने नौकरी सोडून देतो. पुन्हा तो नौकरीच्या शोधात भटकत असतो. या शोधातच एका खेळण्याच्या दुकानावर ‘नौकर पाहिजे’ अशी पाटी दिसते. पण इथेही त्याला नौकरी मिळत नाही. दुकानावर नौकरी मिळण्यासाठी दोन लोकांचे दाखले दुकानदार मागतो. शेवटी तो एका ठिकाणी मटक्याच्या चिठ्ठ्या फाडण्याचे काम करतो. पण, तेथेही तो रमत नाही. जगच विचित्र असल्याने शिक्षक बनण्यापेक्षा समाजशिक्षक बनण्याचा सल्ला काही लोक देतात. कादंबरीत तर एका ठिकाणी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे लोक प्रशांतला भेटल्याचा योग आला आहे. तेव्हा त्याच्याबरोबर काम करण्याचा प्रयत्न केला आहे. पण, तेव्हाच बाबरी मशिद पाडली जाते व दंगल उसळते. नाईलाज म्हणून प्रशांत तीर्थ वाटत असल्याने त्यालाही पकडले जाते व दंगलीत मारहाण होते. कादंबरीच्या निवेदनात निवेदक तीर्थ विकून देशाचे प्रश्न सुटत नाहीत, असे भाष्य करतो. ऐवढेच नाही तर, धर्म माणसाचा बळी घेतो की माणूस धर्माच्या नावान माणसाचा बळी घेतो, असे भाष्य आले आहे. खरे तर धर्माची निर्मिती मानवी कल्याणासाठी झाली आहे. यावर कादंबरीतील एक पात्र फार सुंदर भाष्य करते. “जगातील सर्व धर्म माणसाच्या कल्याणासाठी आहेत. नाशासाठी नव्हेत. यावर आमचा विश्वास आहे. आम्ही सर्व एकाच परमेश्वराचे लेकरं आहोत. म्हणून आम्ही परस्परांच रक्त सांडणार नाहीत.”4

बेकारीची दाहकता प्रशांतच्या जिवणपटातून आली आहे. प्रशांत अनेक ठिकाणी प्रश्नावर मात करण्यासाठी नौकरीच्या शोधात असतो. पण, त्याला मात्र नौकरी मिळत नाही. त्याचे हे सगळे उद्‌ध्वस्त जगणे कादंबरीतील अनेक घटनाप्रसंगातून आले आहे. आपल्या जगण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी प्रशांत प्रयत्न करतो. धर्म, राजकारण, वास्तवातील अनैतिकता, समाजातील आत्मकेंद्रीता कशी आडवी येते, हे कादंबरीतील घटनाप्रसंगातून दिसून येते. शिक्षणाचे पवित्र काम करू पाहणाऱ्या प्रशांतला मटक्याच्या चिठ्ठ्या फाडाव्या लागतात. आर.एस.एस.चा धर्मकेंद्रीत भाग म्हणून तीर्थ वाटावे लागते. व अनेक

 ©EIJMR All rights reserved.

ठिकाणी जीवघेणा मारही खावा लागतो. अनेक घटनाप्रसंगातून ही कादंबरी प्रशांतच्या वास्तव जिवणाला भिडताना दिसते. एकूणच या समाजव्यवस्थेत शिकलेल्या तरुणाच्या व्यथांना ही कादंबरी वाचा फोडते. अनेक वेळेला यातील पात्र मानवी जिवणाच्या तत्त्वाज्ञावर भाष्य करतात. त्यामुळे ही कादंबरी वैचारिकतेकडे झुकताना दिसते. कादंबरीतील पात्राची भाषा व त्यातील नाट्यात्मक संवाद कथानकाला पुढे नेताना दिसतात. या कादंबरीचा गुणात्मक दृष्टिने जसा विचार करता येतो. तशा काही उणिवाही दिसून येतात. पात्राच्या तोंडी आलेले तात्विक भाष्य काही वेळा ती पात्राची वाटत नाहीत. कादंबरीकाराला सांगायचे आहे, तो पात्रांच्या मुखातून सांगतो. असे असले तरी, समकालीन जिवनातील बेकारीसारख्या दाहक प्रश्नाला ही कादंबरी भिडताना दिसते.

2

उत्तम कांबळे यांची ‘बुद्धाचा ऱ्हाट’ ही लघुकादंबरी असून, या कादंबरीतून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या धम्मपरिवर्तनाचा व त्याच्या विचारातून प्रभावित झालेल्या रानबाची कथा होय. या कादंबरीच्या फ्रॉर्मविषयी डॉ. मनोहर जाधव भाष्य करतात, “या कादंबरीचा फ्रॉर्म लघुकादंबरीच्या जवळच नात सांगणारा आहे. एका व्यापक पटावर कादंबरी जीवन दर्शन घडवत असते; परंतु जीवनातील एखादा रसरशीत नाट्यमय जिवन अनुभव केंद्रित ठेवून त्याच परिप्रेक्षात लेखन होत, तेव्हा त्या कथानकाचा घाट लघुकादंबरीच्या दिशेने जातो”5

मनोहर जाधवा यांचे हे भाष्य लक्षात घेतले, तर ही लघुकादंबरी आहे हे लक्षात येते. कादंबरीचा नायक रानबा हा असून, त्याची कथा म्हणजेच ही कादंबरी होय. रानबा हा संगमनेर  जवळील अकोले तालुक्यातील औरंगपूरचा. या कादंबरीतून रानबाचा विचार आणि कृती प्रतिध्वनीसारखे उमटत जाते. रानबा हा शिकलेला नाही. तरीही त्याला चांगली सामाजिक जाणीव आहे. तो गावात अनेक प्रकरणात न्यायनिवाडा करतो. यावरून त्याची प्रतिष्ठाही दिसून येते. महसुलातील काटेकोर खबर ठेवण्याचे कामही तो करतो. तो गंवडी काम करतो. धुरपा ही त्याची बायको. प्रतिकुल परिस्थिती असतानाही तो

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EIJMR All rights reserved.

धम्मदिक्षेसाठी नागपूर गाठतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारान तो प्रभावित झाला आहे. त्यामुळे पैसे नसतानाही तो मुंबईपयर्यंत पायी जाऊन नागपूरला रेल्वेने जातो. 1956 ला धम्मदीक्षा घेतो. या त्याच्या बदलत्या जिवनातील नाट्य म्हणजेच 'बुद्धाचा ऱ्हाट' ही कादंबरी होय. दलिताच्या जीवनात सांस्कृतिक बदलाची सुरुवात 1956 पासून झाली. ती वेगवेगळ्या साहित्यप्रकारातून अविष्कृत होत असल्याचे भाष्य महेंद्र भवरे यांनी केले आहे. "दलिताच्या संदर्भात सांस्कृतिक बदलाची सुरुवात 1956 पासून झाली. त्याची अभिव्यक्ती साहित्यात 1970च्या सुमारास प्रभावित झाली. अस्तित्वाचा शोध घेताना, आपली मूळ शोधताना या अभिव्यक्तीने प्रस्थापित व्यवस्था, धर्म, परंपरा यांना प्रश्न विचारले. प्रस्थापित व्यवस्थेला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले."6

हे भाष्य लक्षात घेतले तर रानबा हा अस्पृश्य असलेला परंतु बाबासाहेबांबरोबर धम्मदीक्षा घेऊन आल्यावर पूर्ण बदलून जातो. गावातील सार्वजनिक विहरीवर तो स्वतः विहीरीमध्ये ऱ्हाटावरून बादली सोडतो. त्याचे वर्णन करताना कादंबरीकार म्हणतात, "रानबा हातातल्या बादलीसह पुढे आला. तो ऱ्हाटाच्या अगदी जवळ गेला. बादलीतला दोर बाहेर काढला. ऱ्हाटावर दोर टाकून दोराचं एक टोक ओढून आपल्या हातात घेतलं. ते बादलीला गच्च बांधल, बादली सोडून दिली विहरीत... ऱ्हाट गरगर फिरु लागला. कालचक्रासारखा."7

यामुळे गावामध्ये खूप मोठा संघर्ष उभा राहिला. रानबाने विहिर बाटवली म्हणून त्याला मारण्यासाठी अनेक लोक पुढे येतात. गावातील पुजारीही देव पाण्यात ठेवून देतो. पुजाऱ्याचा व त्याच्या बायकोचा संघर्ष होतो. पुजाऱ्याची बायको रानबामुळे विहिर बाटणार नाही, तो देव माणूस आहे, असे म्हणते. सगळा गाव रानबाच्या विरुद्ध जातो. आता आपल्या नवऱ्याचे कसे होणार, अशी चिंता रानबाच्या बायकोला लागते. याच वेळेला गावातील काही महाराची मुल बाहेर पडतात. अनेक गावातील लोकांनी गावकी सोडल्यान त्यांच्यावर कसा बहिष्कार टाकला ही चर्चा सुरू होते. काही ठिकाणी लाटी-काठीवरून घर जाळण्याचे प्रकारही झाले होते. येथे मात्र तसे होण्यासाठी गावचा पाटील विरोध करत होता. पाटील व रानबा हे

समवयस्क. रानबा हा तसा अतिशय स्वच्छ वर्तन, मनाचा. त्याची चांगली प्रतिमा कादंबरीच्या कथानकातून समोर येते. या सर्व परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी पाटील, मास्तर व रानबा शाळेत चर्चा करतात. रानबाच वय सत्तरीत गेलेलं तरी त्याचे डोक्याचे केस आताही काळे होते. रानबा असे काही करेल असे ध्यानीमनी नव्हते, म्हणून पाटील रानबाला हे बरोबर न केल्याचे बोलतात. पण रानबा मात्र अजिबात ऐकत नाही. माफी मागण्यापेक्षा रानबा मरायलाही तयार होतो. माणूस म्हणून तरी मरता येईल, असे तो म्हणतो. आपण बुद्ध झाल्याचे तो वारंवार सांगतो.

रानबाचे हे भाष्य रानबाचे तर आहेच त्यातून लेखकाचा दृष्टिकोनही दिसून येतो. लेखक अशा वेळी तटस्थ राहू शकत नाही. हे सांगताना रंगनाथ पठारे म्हणतात, “प्रत्येक कादंबरीकार कादंबरीत काही तरी विधान करू पाहतो. कादंबरीतील घटनाप्रसंग, पात्रे, निवेदन या साऱ्या गोष्टी, ही सारे आयुद्धे वापरून कादंबरीकार पल्याडचे काहीतरी शोधण्याचा प्रयत्न करीत असतो.”8

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ‘शिका-संघटित व्हा आणि संघर्ष करा’ हा संदेश दिला. ज्या 22 प्रतिज्ञा दिल्या, त्याचा परिणाम म्हणून रानबा व्यवस्थेच्याविरुद्ध बंड करून उभा राहतो. धर्मांतरानंतर आपल्या शरीरात नवीन ऊर्जा आली असेही रानबाला वाटते. डॉ. आंबेडकरांच्या विचाराने प्रभावित झालेला रानबाचा विद्रोह या कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे. जात, धर्म व त्यातून आलेली अस्पृश्यता या विरोधात बंड करून उठणाऱ्या रानबा या नायकाची कथा लेखकाने अतिशय प्रभाविपणे उभी केली आहे.

व्यवस्थेला जाब विचारण्याचे भान रानबाला कसे येत गेले, त्याची उकल या कादंबरीच्या घटनाप्रसंगातून होते. व्यक्ती व समाजाचे विचार कादंबरी या वाङ्मयप्रकारातून प्रभावितपणे सांगता येतात. त्याचा प्रत्यय या कादंबरीतून येतो. या संदर्भात वि.का. राजवाडे म्हणतात, “समाजातील वा व्यक्तीतील गुणाचे व विचारांचे प्रदर्शन करण्यास ही दोन साधने उत्तम आहेत., इतकेच नव्हे तर समाजात उत्कृष्ठ विचारांचा पुरुषार्थाचा प्रसार करण्यास कादंबरीसारखे दुसरे सोपे साधनच नाही.”9 राजवाडेचे हे मत लक्षात घेतले तर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विचार रानबा आचरणा कसा आणतो, त्याचे चित्रण उत्तम कांबळे यांने उभे केले आहे.

भाषिकरूपातूनही जातव्यवस्था व तिच्या विरोधातील अस्मिता कादंबरीत अतिशय प्रभाविपणे आली आहे. "पडेल त्या परिस्थितीला तोंड देऊन ते शहरात जगत होते. यंत्राच्या जबड्यात आणि अथांग समुद्रात जात चुरगाळून ते फेकून देत होते. स्वाभिमानाने ते जगत होते."10 'अस्वस्थ नायक' या कादंबरीतून बेकारीची दाहकता व जगणेच नकोसे करायला लावणारी समाजव्यवस्था कादंबरीच्या कथानकातून चित्रित झाले आहे. 'बुद्धाचा ऱ्हाट' या कादंबरीतून भारतीय समाजातून जातवास्तव त्याच्या दाहकतेबरोबरच गुलामी लादणाऱ्या संस्कृतीचे दर्शनही या कादंबरीकाराने घडवले आहे.

## संदर्भग्रंथ सूची

1. डॉ. रवींद्र ठाकूर, 'मराठी कादंबरी ः समाजशास्त्रीय समीक्षा', दिलीपराज प्रकाशन प्रा.लि. पुणे, द्वितीय आवृत्ती 2015. पृ. 353

2. हरिश्चंद्र थोरात, 'कादंबरी ः एक साहित्यप्रकार', शब्द पब्लिकेशन, मुंबई, प्रथम आवृत्ती ऑग. 2010. पृ. 46

3. संपा.डॉ. मृणालीनी शहा, विद्यागौरी टिळक, 'आधुनिक मराठी साहित्य आणि सामाजिकता', पद्मगंध प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती मार्च 2007, पृ. 162

4. उत्तम कांबळे, 'अस्वस्था नायक', मनोविकस प्रकाशन, पुणे, पाचवी आवृत्ती डिसेंबर 2005. पृ. 124

5. उत्तम कांबळे, 'बुद्धाचा ऱ्हाट', मनोविकास प्रकाशन, पुणे प्रथम आवृत्ती डिसेंबर 2015. प्रस्तावना पृ. 8

6. संपा.डॉ. मृणालीनी शहा, डॉ. विद्यागौरी टिळक, 'आधुनिक मराठी साहित्य आणि सामाजिकता', पद्मगंध प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती मार्च 2007, पृ. 163

7. तत्रैव पृ.54

8. गोमटेश्वर पाटील, 'मराठी कादंबरी ः तत्व आणि सिद्धांत', दर्या प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती ऑक्टोबर 2013, पृ. 124

9. संपा. गो.मा. पवार, म. द. हातकंणगलेकर, 'निवडक मराठी समीक्षा', साहित्य अकादमी, दिल्ली, पुर्नरमुद्रण 2008. पृ. 38

10. उत्तम कांबळे, 'बुद्धाचा ऱ्हाट', मनोविकास प्रकाशन, पुणे प्रथम आवृत्ती डिसेंबर 2015. पृ.63.